महाराष्ट्र शासन
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु),
अधिष्ठाता यांचे कार्यालय, डॉ. ॲनीबेझंट रोड,वरळी, मुंबई ४०० ०१८.
०२२ - २४९३४२१४ फॅक्स . . ०२२ - २४९३६८८१
(website :- www.ayurvedinstitute.com, email :- deanrapmc@gmail.com)

---

जा.क्र. राआपोम/भांडार/भोजनालय ठेका/२०२४ /5870 दिनांक :- 06 AUG 2024

**भोजनालय चालविण्याकीरता जाहीरात**

प्रति,

--------------------
--------------------
--------------------
--------------------

विषय :- रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई महाविद्यालयाचे आवारात नव्याने बांधण्यात आलेल्या उपहारगृहातील भोजनालय चालविणेसाठी वार्षिक ठेका देणेबाबत दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रक मागविणेबाबत.

महाविद्यालय अधिनस्त संस्थेतील अध्यापक व कर्मचारी मिळून सुमारे २०० ते ३०० व्यक्तिंचा चहा, नास्ता व शाकाहारी भोजनाची व्यवस्था या महाविद्यालयाच्या आवारात उपलब्ध असलेल्या जुनी रसशाळा इमारत येथील मागील बाजूस नव्याने बांधण्यात आलेले भोजनालय चालू करण्यासाठी ठेकेदाराकडून दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रके मागविण्यात येत आहेत. त्यासाठी खालील अटी व शर्ती यांच्या अधिन राहून दरपत्रक सादर करावे.

१. दरपत्रके दोन लिफाफा पध्दतीची राहतील. लिफाफा क्रं.०१ हा तांत्रिक पडताळणी करीता असेल. लिफाफा क्रं. ०१ मध्ये खालील कागदपत्रे सादर करावी.

१) ठेकेदाराचा पुर्ण पत्ता, दुरध्वनी क्रमांक, जीएसटी क्रमांक

२) अन्न व औषध प्रशासन विभागाअंतर्गत नोंदणीकृत परवानाधारक असल्याची कागदपत्रे

३) जीएसटी प्रमाणपत्र

४) संस्था कंपनी असेल तर कंपनी कायदया अंतर्गत रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र सादर करावे, संस्था पाटर्नर शिप मध्ये असेल तर नोंदणीकृत Partnership Deed सादर करावे.

५) मागील तीन आर्थीक वर्षाचे सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले लेख्यांची प्रत सादर करावी ( Profit & Loss Statement , Balance Sheet )

६) शासकीय/निमशासकीय/खाजगी संस्थेमध्ये भोजनालय चालविण्याचा अनुभव प्रमाणपत्र ज्या ठिकाणी काम केलेले आहे त्या ठिकाणाचा पुर्ण पत्ता, संस्थेचे नाव व दुरध्वनीक्रमांक नमूद करावा.

७) भोजनालय चालविणेसाठी अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे रुपये १००/- च्या स्टॅप पेपरवर देणे बंधनपत्र राहील

८) हमीपत्र -१ व हमीपत्र -२ विहीत नमुन्यात भरुन देण्यात यावे.

लिफाफा क्रं.०२ हा वित्तीय पडताळणी करीता असेल. लिफाफा क्रं.०२ मध्ये भोजनालय चालविण्यासाठी विहीत नमुन्यात पदार्थाचे दर सादर करावेत.

सदरचे दोन्ही लिफाफे वर लिफाफा क्रमांक नमूद करुन ते स्वतंत्र सिलबंद करुन एका मोठया लिफाफयात एकत्र सिलबंद करुन पाठविण्यात यावेत. लिफाफा क्रं.०१ मध्ये पात्र ठरल्यानंतरच लिफाफा क्रं.०२ उघडण्यात येईल.

२. रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय ( आयु.), वरळी, मुंबई अधिनस्त नवीन उपहारगृह येथील भोजनालय चालविण्याचा करार प्रथमतः ११ महिने कालावधीचा असेल. कराराच्या दिनांकापासून पहिल्या अकरा महिन्यांच्या कालावधीत सेवा, खाद्यपदार्थाचा दर्जा, चव, करारात स्विकारलेली किंमत व त्यानुसार प्रत्यक्षात पुरवठा केलेल्या खाद्यपदार्थांचा परिणाम ( वजन, संख्या, प्रमाण इ. ) आणि स्वच्छता तसेच कर्मचा-यांच्या सेवा व वर्तवणूक यांचे मुल्यामापन करुन पुढील ११ महिन्यांच्या कालावधीकरिता करार वाढविण्यात येईल.

३. दरपत्रक सादर करणारा ठेकेदार हा अन्न व औषध प्रशासन विभागाअंतर्गत नोंदणीकृत परवानाधारक असणे बंधनकारक आहे.

४. पात्र ठेकेदारास रुपये ५०,०००/- अनामत रक्कम भरणे बंधनकारक आहे. ठेकेदाराचा करार संपुष्टात आल्यानंतर ठेकेदाराकडून कोणतेही शासकीय येणे, थकबाकी, पाणी-वीज बील, नुकसान भरपाई यासारखी वसूली वजा करुन अनामत रक्कम ठेकेदारास परत करण्यात येईल. करार कालावधीत ठेकेदाराचा अनामत रक्कमवर कोणताही अधिकार असणार नाही.

५. भोजनालय ( मेस ) चालविणेसाठी उपलब्ध करुन दिलेली जागा शासन नियमानुसार विनामुल्य वापरता येईल.

६. पात्र ठेकेदारास विजेच्या मासीक देयकाचा भरणा वेळोवेळी विहीत वेळेत करुन त्याची प्रत कार्यालयास जमा करावी लागेल. या अटीचा भंग झाल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता भोजनालयाचा ठेका रदद करण्यात येईल.

७. पाणी बीला करीता सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरवून दिलेले रुपये १,०००/- दर महिन्याच्या ७ तारखेपर्यंत कार्यालयातील रोखपाल यांचेकडे भरणा करावेत. पाणी शुध्दीकरणाकरीता आर.ओ व्यवस्था स्वतःठेकेदारास करावी लागेल.

८. स्वयंपाकाची भांडी, ताटे, वाटया, शेगडया, गॅस इत्यादी सामानाची व्यवस्था ठेकेदारास करावी लागेल. अग्निसंरक्षक यंत्रणा व्यवस्था ठेकेदारास करावी लागेल.

९. भोजनालय ( मेस ) सकाळी ७.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत सुरु राहील.

१०. भोजलनालय चालविणेसाठी विहीत करण्यात आलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर लिखित स्वरुपात देणे बंधनकारक राहील.

११. भोजनालयाच्या ताबा स्विकारतेवेळी भोजनालयामध्ये आवश्यक असणारी किरकोळ दुरुस्ती ठेकेदारास करावी लागेल. भोजनालयात बसण्याकरिता आवश्यक त्या खुर्चा, टेबलाची व्यवस्था ठेकेदारास करावी लागेल.

१२. सुटीच्या दिवशी व अन्य प्रसंगी महाविद्यालयाच्या सहमतीशिवाय भोजनालय बंद ठेवता येणार नाही.

१३. ज्या ठिकाणी अध्यापक/कर्मचा-याची बसण्याची व्यवस्था असेल तेथे खाद्य पदार्थांची

दरसूची लावणे बंधनकारक राहील.

१४. दैनंदिन जेवणासाठी मर्यादीत व अमर्यादीत (पोटभर) भात, पोळया/पु-या, भाजी, उसळ, कोंशिबीर,चटणी/लोणचे, लिंबु, मीठ यासह आमटी/कढी, दहीवाटी, पापड यांचा समावेश असेल त्यानुसार थाळीचा दर नमूद करावा.

१५. सकाळी ( Nescafe instant tea / coffee ) चहा/कॉफी तसेच अल्पोहार ( नास्ता ) यांचे दर सोबत जोडलेल्या यादीवर नमूद करावेत.

१६. भोजनालय समिती कोणत्याही क्षणी भोजनालयातील खाद्यपदार्थांच्या दर्जाची तपासणी करु शकतील.खाद्यपदार्थांचा आवश्यक तो दर्जा न आढळल्यास ठेकेदारास देण्यात आलेला ठेका तात्काळ रदद करण्यात येईल.

१७. भोजनालयात मांसाहारी प्रकारचे जेवण बनविण्यास सक्त मनाई आहे. मादक व तंबाखुजन्य पदार्थ वितरीत करता येणार नाही.

१८. भोजनालयात तसेच भोजन कक्षामध्ये स्वच्छता ठेवणे बंधनकारक आहे. कचरा व्यवस्थापन (घन व द्रव) हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियमानुसार कार्यवाही ठेकेदारास स्वत: करावी लागेल.

१९. ठेकेदारास १४ वर्षाच्या खालील वयाच्या मुलांचा / मुलींचा ( बालकामगार ) भोजनालयाच्या कामासाठी वापर करता येणार नाही.

२०. भोजनालयातील स्वयंपाकी, वेटर, साफसफाई करणारे मनुष्यबळ स्वच्छ गणवेशात असावेत. त्यांची वर्तवणूक नम्रतेची असावी. सदर कर्मचा-यांची वेळावेळी वैद्यकीय चाचणी घेण्यात यावी. मनुष्यबळाच्या वैद्यकीय तपासणीचे कागदपत्रे कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. संसर्गजन्य आजाराने बाधीत व्यक्ती भोजनालयात काम करणार नाही याची दक्षता घ्यावी. कर्मचा-यांच्या चरित्रासंबधीचा पोलीस अहवाल कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. भोजनालयात ठेकेदाराच्या कर्मचा-यांच्या व्यतिरीक्त अन्य अनधिकृत व्यक्तीस प्रवेश असणार नाही.

२१. भोजनालयाचा करार संबधित ठेकेदाराशी केला असल्याने परस्पर अन्य कंत्राटदारास कंत्राट देता येणार नाही अगर करार करता येणार नाही.

२२. करारातील अटी व शर्तीनुसारच अन्न व औषधे प्रशासनाचे नियमानुसार अन्न विक्री/नोंदणी परवाना/प्रमाणपत्र कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे आरोग्य परवाना कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

२३. करारनाम्यातील अटी व शर्ती याचा भंग झाल्यास अथवा भोजन योग्य रीतीने न पुरविल्यास आपणावर दंड आकारण्याचे तथा आपली सुरक्षित ठेव रक्कम जप्त करण्याचे तसेच आपला ठेका रदद करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांना राहतील.

२४. आपण पुरविलेले भोजन भेसळयुक्त आहे असे निदर्शनास आल्यास व तसे सिध्द झाल्यास भेसळ प्रतिबंधक कायदा व अन्न व औषध प्रशासन विभागातंर्गत होणा-या कारवाईस संबधित ठेकेदार जबाबदार राहील.

२५. सदर भोजनालयाचा ( मेस ) वापर कोणत्याही व्यापारी स्वरुपाच्या प्रयोजनासाठी करता येणार नाही.

२६. दरपत्रक सादर करतेवेळी ठेकेदाराकडे बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे आरोग्य परवाना नसल्यास भोजनालय चालविणेबाबतचे आदेश प्राप्त झाल्यापासून ०३ महिने किंवा त्याअगोदर तात्काळ बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे आरोग्य परवाना प्राप्त करुन घेवून या

कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील अन्यथा प्रदान करण्यात आलेला ठेका कोणतीही पुर्वसूचना न देता रदद करण्यात येईल व तदनंतर ठेकेदाराचे काही आर्थिक नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित ठेकेदाराची राहील.

२७. प्राप्त दरपत्रकानुसार अल्पोपहार, भोजन व इतर खाद्यपदार्थ यांचे दर अंतिमत: निश्चित करण्याचे अधिकार समितीस राहतील, भोजनालयातील खाद्यपदार्थांचे दर निश्चित झाल्यानंतर समितीच्या मंजूरी शिवाय खाद्यपदार्थाचे दर कोणत्याही कारणास्तव वाढवता येणार नाहीत.

२८. दरपत्रकधारकांनी केवळ एकच दरपत्रक सादर करावे. दरपत्रक सादर केलेल्या दरपत्रक धारकांचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेतलेल्या इतर संस्थासोबत प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबध व सहभाग नसावा. आढळल्यास दरपत्रक नाकारण्यात येईल.

२९ दरपत्रक सादर करणा-या दरपत्रकधारकाचा किंवा संस्थेचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्थ असू नये. तसे आढळल्यास दोन्ही किंवा अधिक दरपत्रके नाकारण्यात येतील. याकरिता सोबत जोडण्यात आलेले हमीपत्र दरपत्रक धारकास सादर करणे बंधनकारक राहील.

३०. ठेकेदाराशी केलेला करार रदद करणे, पुढे सुरु ठेवणे याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार अधिष्ठाता, रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय ( आयु.), वरळी, मुंबई हे राखून ठेवत आहेत.

३१. ठेकेदारास करार रदद करावयाचा असेल तर किमान एक महिना आधी त्याची लेखी पूर्वसूचना अधिष्ठाता, रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई यांना द्यावी लागेल. तसेच अधिष्ठाता ठेकेदाराची वर्तणूक चांगली असतांना काही अपरिहार्य कारणास्तव ठेकेदाराशी केलेला करार रदद करावयाचा असल्यास एक महिना आधी तशी लेखी पूर्वसूचना ठेकेदारास देण्यात येईल. मात्र ठेकेदाराकडून अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्यास किंवा काही बेजबाबदार वर्तवणूक आढळून आल्यास करार उपहारगृह समितीच्या तपासणीनंतर तात्काळ रदद करण्याचा हक्क अधिष्ठाता राखून ठेवत आहे.

३२. संस्थेतील कोणत्याही व्यक्तीस उधारीवर कोणत्याही बाबीचा पुरवठा करण्यात आल्यास त्याबाबतची वसूलीची जबाबदारी ठेकेदारची राहील. त्याबाबत संस्था कोणतीही जबाबदारी घेणार नाही.

३३. सदर भोजनालय फक्त रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई व म.आ.पोदार रुग्णालय, वरळी, मुंबई येथील अधिकारी/कर्मचारी यांच्या भोजनालय सोई करिता असेल. या भोजनालयातील सुविधाचा उपयोग बाहेरील अन्य व्यक्तीस घेता येणार नाही.

३४. दरपत्रक सादर करताना GST क्रमांक नमूद असलेल्या लेटरहेडवर सादर करावे.

३५. वरील क्रंमाक १ ते ३५ अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार अधिष्ठाता, रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई हे राखून ठेवत आहेत.

वरील सर्व अटी व शर्ती विचारात घेऊन जेवणाच्या थाळीचा योग्य तो दर नमूद करुन आपली मोहोरबंद दरपत्रके दिनांक २६.०८.२०२४ सांय ५.०० वाजेपर्यंत पाठवावी. मोहोरबंद पाकीटावर "भोजनालय दरपत्रक" असे स्पष्टपणे नमूद करावे. अंतिम मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. दरपत्रके दिनांक २८.०८.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता अधिष्ठाता, रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय, वरळी, मुंबई यांचे दालनात उघडण्यात

येतील. त्यावेळी आपण किंवा आपला प्रतिनीधी यांना स्वखर्चाने उपस्थित राहणेस परवानगी देण्यात येत आहे.

दरपत्रके स्विकारणे किंवा नाकारणे यासंबधीचा संपूर्ण अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवलेला आहे त्याप्रमाणे कोणत्याही प्रकरणावर अधिष्ठाता यांचा निर्णय अंतिम राहील.

Sd/-

( वैद्या संपदा सं.संत )
अधिष्ठाता,
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.),
वरळी, मुंबई

प्रत,
महाविद्यालयीन सूचनाफलक

D:canteen 2

## खाद्यपदार्थांचे नाव

| अ.क्र. | पदार्थाचे नाव | प्रस्तावित दर रुपये |
|---|---|---|
| १ | जेवण ( साधे), ४ चपाती, २ भाज्या ( रस्सा, सुकीभाजी) लोणचे/पापड, १ मुदभात (सिंगल वाटी), वरण ( फोडणीचे )/डाळ, कोशींबीर/सलाड | |
| २ | जेवण ( साधे), ४ चपाती, २ भाज्या ( रस्सा, सुकीभाजी) लोणचे/पापड, ) पुलाव , वरण ( फोडणीचे )/डाळ, कोशींबीर/सलाड जेवण ( स्पेशल व स्वीट ) | |
| ३ | जादा चपाती ( प्रति चपाती ) | |
| ४ | मेंदू वडा सांबार ( ०२ नग ) | |
| ५ | मेंदु वडा चटणी ( ०२ नग ) | |
| ६ | इडली सांबार ( ०२ नग ) | |
| ७ | इडली चटणी ( ०२ नग ) | |
| ८ | साधा समोसा ( ०२ नग ) | |
| ९ | पंजाबी समोसा ( ०२ नग ) | |
| १० | मिसळ पाव | |
| ११ | उत्तप्पा ( साधा ) | |
| १२ | उत्तप्पा ( ओनियन) | |
| १३ | बटाटा वडा सांबार ( ०२ नग ) | |
| १४ | बटाटा वडा चटणी ( ०२ नग ) | |
| १५ | कांदा भजी | |
| १६ | कांदा पोहे | |
| १७ | उपमा | |
| १८ | शिरा | |
| १९ | साधा डोसा | |
| २० | टोमॅटो ऑम्लेट | |
| २१ | चहा साधा ( फूल ) | |
| २२ | चहा साधा ( कटींग ) | |
| २३ | चहा स्पेशल ( फूल ) | |
| २४ | चहा स्पेशल, हर्बल/ब्लॅक/लेमन | |
| २५ | दुध ( फूलग्लास ) | |
| २६ | दुध ( हाफ ग्लास ) | |
| २७ | ब्रेड बटर | |
| २८ | नेसकॉफी फूल | |

| अ.क्र. | पदार्थाचे नाव | प्रस्तावित दर रुपये |
|---|---|---|
| २९ | गव्हाच्या पीठाची फ्रँन्की ( व्हेज)/व्हेज रोल | |
| ३० | पावभाजी | |
| ३१ | फ्रुट प्लेट | |
| ३२ | फ्रुट ज्युस | |
| ३३ | मसाला डोसा | |
| ३४ | साबुदाना वडा / खिचडी | |
| ३५ | उत्तपा चिझ | |
| ३६ | साधा सॅडविच | |
| ३७ | ग्रिल सॅडविच | |
| ३८ | ताक | |
| ३९ | उपवास कचोरी/मिसळ | |
| ४० | सिलबंद पिण्याचे पाणी | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

## हमीपत्र -१ ( Undertaking )

मी M/s. ..........................................................................................................

पत्ता :- ..........................................................................................................
लेखी हमी देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत भोजनालय चालविणेसाठी वार्षिक ठेका देणेबाबत राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी भाग घेत असून माझे किंवा माझ्या संस्थेचे खरेदी प्राधिकारी/खरेदी समिती वा कार्यालयाशी कोणत्याही प्रकारचे हितसंबध/संघर्ष नाहीत तसे आढळून आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

भोजनालय ठेका पुरवठादारांच्या अधिकृत स्वाक्षरी व शिक्कासह

स्थळ :-

दिनांक :-

..........................................................................................................

## हमीपत्र-२ ( Undertaking )

मी M/s. ........................................ पत्ता :- ................................................
लेखी हमी देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत भोजनालय चालविणेसाठी वार्षिक ठेका देणेबाबत राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी/माझी संस्था केवळ एकच दरपत्रक सादर करीत आहे. त्याचप्रमाणे दरपत्रक प्रक्रियेत भाग घेण्या-या अन्य संस्थांसोबत माझा/माझ्या संस्थेचा कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबध वा सहभाग नाही तसे आढळून आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

भोजनालय ठेका पुरवठादारांच्या अधिकृत स्वाक्षरी व शिक्कासह

स्थळ :-

दिनांक :-